# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/१०/२०२५ ( रविवार )**

---

## पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील रेकॉर्डवरील चार गुन्हेगारांना करण्यात आले हद्दपार

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अभिलेखावरील, अवैध दारुचा व्यवसाय करणारे, शरीराविरूध्दचे गुन्हेगार तसेच मालमत्ते विरूध्द गुन्हयातील गुन्हेगार यांचेविरूध्द वारंवार कार्यवाही करुन तसेच प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सुध्दा खालील नमुद आरोपीतांनी त्यांचे गुन्हेगारी कृती निरंतर सुरू ठेवली होती. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचे असल्याने अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवित होते. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे तसेच सध्या सुरू असलेले व आगामी येणारे सणोत्सव आणि आगामी काळात निवडणुक असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांकडुन आरोपी **नामे १) पवन उर्फ वैभव सुधाकर कांबळे, वय ३० वर्षे, रा. कुकडीपांजरा , ता काटोल २) दिलीप चंपत शेंडे, वय ३६, रा. मसली ३) रूपेश उर्फ राजेश सोमराज पाटील, रा. लिंगा ४) विक्की अमऱ्या राजपुत, वय ३५ वर्षे, रा.डोंगरगाव** यांना नागपुर जिल्हयातुन हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांच्या कडे पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळाली असुन नमुद आरोपीतांना नागपुर जिल्हयातुन ,नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण हद्दीतुन २ महीन्यांकरीता हद्दपार करण्यात आले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन असल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी .



पवन उर्फ वैभव सुधाकर कांबळे



दिलीप चंपत शेंडे





**रूपेश उर्फ राजेश सोमराज पाटील** **विक्की अमऱ्या राजपुत**

## नोकरी लावून देण्याचे आमीष दाखवून नोकरीची गरज असणाऱ्या विदयार्थ्यांची आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीला कुही पोलीसांनी केली अटक

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस स्टेशन कुही येथे दिनांक १५/०९/२०२५ रोजी फिर्यादी यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी व त्याचे मित्रांना आरोपी नामे पुरूषोत्तम ज्ञानदेव बिलेवार, माजी सैनिक, वय ४२ वर्ष, रा.सैनिक कॉलनी शेगाव जि.बुलढाणा याने सरकारी नोकरी लावुन देतो असे आमिष दाखवुन १४,६०,०००/— रूपयांची फसवणूक केली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कुही येथे नमुद आरोपी विरूध्द कलम ३१८(२), ३१८(४) भान्यासं २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी पुरूषोत्तम ज्ञानदेव

बिलेवार याने ११ गरजु बेरोजगार तरूणांची फसवणूक केल्याचे निष्पन्न केले. तसेच फसवणुकीची एकुण रक्कम ३४,६०,०००/— रूपये असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करत तांत्रिक पुराव्यावरून नमुद गुन्हयातील आरोपी यास शेगाव जि. बुलढाणा येथुन पोलीस स्टेशन शेगाव ग्रामीण यांचे मदतीने शिताफतीने ताब्यात घेतले. पोलीसांनी शेगाव येथे आरोपीच्या घराची झडती घेतली असता झडती मध्ये पैसे मोजण्याचे मशिन मिळुन आले.नमुद अरोपीला कुही पोलीसांनी अटक केली असुन दिनांक १४/१०/२०२५ पर्यंत आरोपी पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.

आरोपी हा माजी सैनिक असुन समर्थ करीअर ॲकॉडमी नावाच्या यु—टुब चॉनलच्या माध्यमातुन तसेच ईन्स्टाग्रामच्या माध्यमातुन आरोपी याने व्हिडीओ तयार करून बेरोजगार विदयार्थ्यासोबत संपर्क तयार करून त्यांना रेल्वे, आर्मी, पोलीस अश्या विविध विभागमध्ये नोकरी लावून देतो तसेच मेडीकल क्लिअर करून देतो असे सांगुन विदयार्थ्यांची फसवणुक करून त्यांच्या कडुन पैसे घेतले. आरोपीची स्वत:ची शेगाव जि.बुलढाणा येथे समर्थ करीअर ऑकाडमी आहे. त्याचप्रमाणे शिर्डी रोडवर बहीरम हंडी नावाने त्याचे मालकीचे हॉटेल आहे.

नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना तसेच विदयार्थ्यांना अवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणुक झाली असल्यास तात्काळ पोलीस स्टेशन कुही येथे संपर्क सधावा.

**संपर्क कमांक**

पोलीस स्टेशन कुही, नागपुर ग्रामीण — **07100222227**
पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळ — **9923286224**
पोउपनि श्री स्वप्निल गोपाले — **8080678582**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**